सर्वोत्तम संस्थेसाठी कॅनडा येथील कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने सन्मानित

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

ज्ञानगंगा घरोघरी

गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक-४२२२२२

Ph. :0253-2230580, http://ycmou.digitaluniversity.ac e-mail : nondani@ycmou.digitaluniversity.ac

नोंदणी कक्ष

जा.क्र. : नोंदणी/२०२१/ ५०८ दिनांक : ०१/०३/२०२१

सूचनापत्र क्र. ३१

अभ्यासकेंद्र पडताळणी (Study Center Approval) **पेडींग असलेल्या विद्यार्थ्यांबाबत...**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमांसाठी सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रवेश अर्ज सादर करुन शिक्षणक्रम शुल्क विद्यापीठ हिस्सा ऑनलाईन पध्दतीने भरला आहे. सदर विद्यार्थ्यांनी अभ्यासकेंद्राकडून प्रवेशाची पडताळणी योग्य त्या कागदपत्रांच्या आधारे अभ्यासकेंद्राकडून (Study Center Approval) करणे आणि अभ्यासकेंद्र शुल्क भरणे आवश्यक होते. मात्र ही प्रक्रिया अद्यापपर्यंत पुर्ण न केल्यामुळे अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित करता आलेले नाहीत.

अभ्यासकेंद्र मान्यता प्रलंबित असणाऱ्या विद्यार्थ्यांशी संबंधित अभ्यासकेंद्रांनी ऑनलाईन संपर्क साधून विद्यार्थ्यांचे पात्रता कागदपत्र E-Mail किंवा WhatsApp व्दारे मागवून घ्यावयाची आहेत. अभ्यासेकंद्रांनी अशा विद्यार्थ्यांची कागदपत्रे तपासून अभ्यासकेंद्र मान्यता (Study Center Approval) द्यावयाची आहे. सदर प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी अंतिम मुदत दिनांक १०.०३.२०२१ आहे. दिनांक १०.०३.२०२१ नंतर अभ्यासकेंद्र मान्यता प्रक्रिया लिंक बंद करण्यात येईल . त्यानंतर अभ्यासकेंद्रास असे प्रवेश मान्य करता येणार नाही.

जे विद्यार्थी सदर प्रक्रिया पूर्ण करणार नाहीत अशांचे प्रवेश निश्चित होणार नाहीत व त्यासंबधीची जबाबदारी अभ्यासकेंद्र आणि विद्यार्थ्यांची राहील याची कृपया नोंद घ्यावी.

Vlande 01/03/2021

(श्रीमती. वंदना झेंडे)
सहायक कुलसचिव,
नोंदणी कक्ष. वि.से.वि.

(डॉ. प्रकाश देशमुख)
संचालक,
विद्यार्थी सेवा विभाग.

प्रतः माहितीसाठी व वरीलप्रमाणे कार्यवाहीसाठी
सर्व विभागीय संचालक/ वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार,
आपणास कळविण्यात येते की, वरील सूचनापत्रक सर्व अभ्यासकेंद्राच्या व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास येईल याबाबतची कार्यवाही करावी.